Dr. Achyut V. Mane
M. A. Ph. D.
Ex. President
City Municipal Council, NIPANI.
Tal. - Chikodi Dist. - Belgaum.
Phone - Office : 20137 Resi : 20632
Reader in Marathi
Devchand College, Arjunnagar
Dist: Kolhapur.

Date : २४/१२/९७

## // प्रमाण पत्र //

प्रमाणित करण्यांत येते की श्री. प्रमोद शामराव कांबळे यांनी " प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकांचा अभ्यास ( किरवंत आणि तन - माजोरी यांच्या अनुषंगाने) या विषयावरील प्रबंधिकेचे संशोधनकार्य माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या केले असून ते समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

ही प्रबंधिका यापूर्वी कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदर प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. (मराठी) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे. सदर प्रबंधिका आधुनिक मराठी साहित्य या अभ्यास क्षेत्रात समाविष्ट होते.

अर्जुननगर.
दिनांक: २४ - १२ - १९९७.

(प्रा. डॉ. अच्युत वि. माने)
मार्गदर्शक

" प्रतिज्ञा पत्र "

प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकांचा अभ्यास ( किरवंत आणि तन - माजोरी यांच्या अनुषंगाने ) या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. ( मराठी ) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे.

ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

( श्री. प्रमोद शामराव कांबळे )
अभ्यासक

= मनोगत =

मी एम.ए. ला होतो तेंव्हा पासून एम.फिल. करण्याची मनात एक तीव्र इच्छा होती. ही इच्छा पूर्ण होण्यासाठी एक योगायोग म्हणावा लागेल की मी एम.ए. झालो त्यानंतर एक वर्षानी लगेचच आमच्या कॉलेजला एम.फिल. या पदवी परीक्षेसाठी शिवाजी विद्यापीठाने मान्यता दिली. त्यामुळे मला आणखी प्रोत्साहनच मिळाले. आणि मी आमच्या सरांच्याकडे गेलो आणि माझ्या विषयाची चर्चा करून प्रेमानंद गज्वी यांची किरवंत आणि तन-माजोरी ही दोन नाटके निवडली. सुरूवातीला या नाटकांची पुस्तके शोधण्यास खूप अडचणी आल्या. कोल्हापूर, पुणे, मुंबई अशा ब-या ठिकाणी मी चौकशी केली पण त्यांच्या प्रती शिल्लक नसल्याने ही नाटके मिळेनाशी झाली. पण शेवटी बेळगांव येथील सार्वजनिक वाचनालयात या दोन्ही नाटकांची पुस्तके मिळाली. प्रत्यक्षात जेंव्हा ही नाटके माझ्या हातात मिळाली तेंव्हा माझ्या समोर एक आव्हानच उभे राहिले. मुळात मी ग्रामीण भागात रहाणारा असल्याने नाटक हा वाड:मय प्रकार केवळ पुस्तकातून वाचावयास मिळत होता. प्रत्यक्ष नाटक पाहण्याची संधी फार कमी वेळा मिळाली. पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरात त्याचे प्रयोग होत असल्याने मला त्याची फारशी कल्पना नव्हती पण हे आव्हान पेलण्याचे सामर्थ्य केवळ माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. अच्युत माने सर यांच्यामुळे मिळाले. कारण मुळातच ते सामाजिक चळवळीत काम केलेले, स्वत: एक मराठीचे जाणकार समीक्षक आणि कर्नाटक महाराष्ट्र अशा दोन्हीकडे विचारवंत म्हणून सर्वांना परिचित असल्याने त्यांचे मार्गदर्शन हे मला माझ्या प्रबंधिकेच्या दृष्टीने एका दिपस्तंभासारखे ठरले. योगायोगाने दलित रंगभूमीचे "थांबा रामराज्य येतय" हे नाटक निपाणी शहरात सार्वजनिक ठिकाणी दाखविले गेले आणि माझ्या मनात दलित रंगभूमी आणि प्रायोगिक नाटका विषयी आकर्षण निर्माण झाले. शिवाय मी ही स्वत: डॉ. आंबेडकर समता मंच निपाणी, निपाणी भाग या सामाजिक कार्य करणा-या संघटनेचा सक्रिय कार्यकर्ता असल्याने आणि मी

जी नाटके निवडली तीही सामाजिक आशयाची व चळवळीच्या पार्श्वभूमीतून निर्माण झाली असल्याने त्याचे संशोधन करणे सोपे झाले. या संशोधनाचे काम करत असताना ज्यानी ज्यानी मला सहकार्य दिले त्या सर्वांचे आभार मानने हे माझे प्रथम कर्तव्य समजतो.

या प्रबंधिकेसाठी सर्व प्रथम आभार मानायला हवे ते म्हणजे बेळगांव येथील सार्वजनिक वाचनालयाचे त्याच बरोबर माझ्या कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. जे. कशाळीकर सर यांचा मी आभारी आहे. शिवाय मराठीचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. व्ही. कुलकर्णी, प्रा. पुनामुरी मॅडम, प्रा. व्ही. एस. रेंदाळकर यांचेही मला वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. त्याच बरोबर माझ्या कॉलेजच्या ग्रंथालयातील सर्व कर्मचारी वर्गानी मला सहकार्य केले. त्याबददल मी त्यांचेही या ठिकाणी आभार मानतो. ज्यांच्या ऋणातून मी कधीही मुक्त होऊ शकत नाही ते माझे आई-वडील त्यांच्या आशिर्वादानेच मी हा प्रबंध पूर्ण करु शकलो, त्यांचाही मी ऋणी आहे. तसेच ज्या संघटनेचा मी उल्लेख केला त्या संघटनेचे अध्यक्ष माझे सहकारी मित्र संजीवकुमार शितोळे, सुरेश कांबळे, उत्तम पोवार, आणि रमेश देसाई यांचेही मला सहकार्य मिळाले त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो. त्याचबरोबर माझ्या आईवडिला इतकेच ज्यांचे ऋण माझ्यावर आहेत ते माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. अच्युत माने सर त्यांच्याकडून या प्रबंधिकेसाठीच मला मार्गदर्शन मिळाले असे नाही तर जीवनाची एक योग्य दिशा मिळाली. त्यामुळे मी त्यांचे हे ऋण कधी फेडू शकत नाही. स्वत:ची तब्बेत ठीक नसतांना देखील त्यांनी माझ्या प्रबंधिकेसाठी जे मार्गदर्शन केले ते मी माझ्या आयुष्यात कधीही विसरु शकणार नाही. त्यामुळे मी त्यांचा सदैव ऋणी आहे. तसेच या प्रबंधिकेचे टंकलेखन काळजीपूर्वक केल्याबद्दल मी श्री. शंकर चव्हाण व त्यांच्या मिसेस सौ. शैलजा चव्हाण यांचा आभारी आहे.